# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ३०/०६/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक ३०/०६/२००५ रोजी सभा सुचना क्र. ०८ दि. २७/०६/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सभापती |
| २) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सदस्य |
| ३) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ४) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ५) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ६) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| ७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ८) | श्री. मिलन गोविंद पाटील | सदस्य |
| ९) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १०) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ११) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| १२) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १३) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सदस्य |

**गैरहजर असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| २) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ३) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ह्यांचे मी सर्वांचे वतीने हार्दिक स्वागत करतो आणि आजच्या सभेला सुरुवात करणेबाबत सचिवांना निर्देश देत आहे. तत्पुर्वी विषय क्र. ५१ आणि विषय क्र. ५२ हे विषयपत्रिकेवरील विषय झाल्यानंतर घेण्यात यावेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती महोदय, सभा सुरु होण्यापुर्वी माश्यांचे प्रमाण भरपूर वाढले आहे. त्याच्याकरिता काय उपाययोजना केल्या आहेत त्याची माहिती द्या. कॉलराची साथ येऊ शकते.

**मा. सभापती :-**

विषयपत्रिकेवरील विषयाला सुरुवात करा. नंतर सदर विषयावर चर्चा करु.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ४९ चे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती महोदय, दुर्बल घटकांचा निधी आपण कुठे कुठे वापरु शकतो व तो निधी वापरण्याकरिता कोणता निकष लागू होतो?

**दिपक खांबित :-**

दुर्बल घटक निधीचा जी.आर. आहे आणि पाच टक्के जो निधी असतो तो समाजातील दुर्बल घटक, अनुसूचित जाती / जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती ह्यांच्या कल्याणकारी योजनांकरीता राखून ठेवलेला आहे. तो त्या वस्त्यांमध्ये वापरायचा असतो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

प्रभाग क्र. १० मध्ये आपण हा निधी वापरतोय, तिथे हा निकष लागू आहे का?

**दिपक खांबित :-**

त्याच्यामध्ये स्मशानभूमीचे काम घेणार नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्याच्यामध्ये स्मशानभूमीचे काम घेता येत नाही, मग काय करायचे?

**दिपक खांबित :-**

जनरल फंडातून घ्यायचा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मग तसा उल्लेख करा.

**दिपक खांबित :-**

आपण विषयपत्रिका बघा. हा विषय बांधकाम खात्याचा नाही, तर टाऊन प्लॅनिंगचा विषय आहे. ह्या विषयाला प्रशासकीय आर्थिक मंजुरी घ्यायची आहे.

**मा. सभापती :-**

सदर विषयाचा गोषवारा सन्मा. सदस्यांना देण्यांत आलेला आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ह्या विषयाचा गोषवारा कुठे दिला?

**गजानन भोईर :-**

गोषवारा दिलेला आहे.

(सन्मा. सदस्य श्री. केशव घरत ह्यांनी प्रकरण क्र. ४९ चा ठराव सभागृहात मांडला.)

**सुर्यकांत भोईर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

दुर्बल घटकातून खर्च करणार नाही का?

**मा. सभापती :-**

जनरल फंडातून खर्च करायचा आहे आणि जागेचा जो बदल करायचे आहे, स्मशान भूमीचे रिझर्व्हेशनमध्ये जी जागा घोडबंदरला आहे त्याच्यासमोर एका खाजगी मालकाची जागा आहे. ती जागा महानगरपालिकेकडे वर्ग करायची आणि जी स्मशानभूमीची जागा सध्या अस्तित्वात आहे ती जागा त्यांना द्यायची अशी अदलाबदल करुन घ्यायची. ह्याबाबत सर्व अधिकार आपण आयुक्त साहेबांना देत आहे. त्याला अंदाजित आर्थिक व प्रशासकीय खर्च पन्नास लाखाचे आहे. ती मंजुरी त्या कामाकरिता ह्या सभेने दिलेली आहे. सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ४९ :-**

प्रभाग क्र. १० मध्ये घोडबंदर येथे हिंदू स्मशानभूमी / मुस्लीम दफनभूमी विकसित करणेबाबत. (दुर्बल घटक निधी अंतर्गत काम करणेबाबत.)

**ठराव क्र. ५४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - घोडबंदर, स.क्र. २३५, २३६ व २३७ हि जागा ७/१२ उताऱ्यानुसार ग्रुप ग्रामपंचायत घोडबंदर यांच्या मालकीची असून तीचा वापर मसनवट म्हणून दर्शविण्यात आला आहे. उक्त जागेचे अनुक्रमे क्षेत्र १०००.०० चौ.मी., २००.०० चौ.मी. व ५००.०० चौ.मी. (एकूण १७०००.०० चौ.मी.) इतके आहे.

शहराच्या मंजूर विकास योजनेत स.क्र. २३५ खालील जागा भागशः नाविकास व डोंगराळ भागात सामाविष्ट असून स.क्र. २३६ व २३७ खालील जागा डोंगराळ भागात सामाविष्ट आहे.

उक्त जागेचे तालुका निरीक्षक भुमी अभिलेख ठाणे यांनी मोजणी केली असून मोरन २१८२/०४ दि. २२/०४/२००४ अन्वये मोजणी नकाशा सादर केला आहे. सदर नकाशावर खाजगी सर्व्हेहर मे. नियश यांनी विद्यमान स्मशान भुमीची मोजणी करुन हद्दी दर्शविण्यात आल्या आहेत.

उक्त नकाशाचे अवलोकन केले असता खालील प्रमाणे वस्तुस्थिती दिसून येते.

सदरची विद्यमान स्मशानभुमी स.क्र. २३५पै., २३६पै., २३७पै., व स.क्र. २०३, हि.क्र. १५पै., व ९पै. या जागेमध्ये सामाविष्ट आहे. या जागे पैकी स.क्र. २०३, हि.क्र. १५पै., व ९ पै., हि जागा खाजगी मालकीची असून ७/१२ उताऱ्या प्रमाणे हि.क्र. १५ चे मालक श्री. ईश्वरसिंग सन्मुखसिंग व श्री. भारत मोहनलाल शहा हे आहेत. तसेच हि.क्र. ९ चे मालक श्री. ग्रामदेवी व श्री. गजन्नाथ मुकुंद वैती व इतर आठ हे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडील जा.क्र. मनपा/साबां/४७६३/२००४-०५, दि. १६/०९/२००४ अन्वयेच्या पत्राच्या अनुषंगाने असे दिसून येते की, विद्यमान स्मशानभुमी मध्ये जेवढी खाजगी जागा सामाविष्ट होत आहे. तीतकी शासकीय जागा बदलीने जमिन मालकास दिल्यास जमिन मालक जागा अदलाबदलीत तयार असल्याचे दिसून येते. तसेच सदर स.क्र. २३५, २३६ व २३७ या जागेची भौगोलिक रचना पाहता त्याप्रमाणे स्मशानभूमीसाठी विकसित करावयाचे ठरल्यास एक सलगता येत नाही. त्यामुळे विद्यमान स्मशानभुमी व या सोबतच्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे जागेच्या (स्मशानभुमी) आखणीत बदल केल्यास

स्वतंत्ररित्या स्मशानभुमी / दफनभुमीसाठी जागा उपलब्ध व वापराखाली येऊ शकेल. या साठी Deed of Exchange नोंदणीकृत करावे लागेल.

वरील वस्तुस्थिती मे. राणे यांच्या मोजणी नकाशात दर्शविण्यात आली आहे. त्यानुसार खालील प्रमाणे क्षेत्र बदली होणार आहे.

| **स.क्र.** | **महानगरपालिकेकडे** | **खाजगी मालकाकडे** |
|---|---|---|
| २३५ | ४३९.०० चौ.मी. | ५६१.०० चौ.मी |
| २३६ | १०६.०० चौ.मी. | ९४.०० चौ.मी. |
| २३७ | २९३.०० चौ.मी | २०७.०० चौ.मी. |
| २०३/१५ | ७०१.०० चौ.मी. | |
| २०३/९/२ | २८९.०० चौ.मी. | ----- |
| एकूण क्षेत्र | १८२८.०० चौ.मी. | ८६२.०० चौ.मी. |

| | |
|---|---|
| महानगरपालिकाकडून खाजगी जमिन - मालकास बदलीने देण्यात येणारे क्षेत्र | ८६२.०० चौ.मी. |
| खाजगी जमिन मालकाने महानगरपालिकेस बदलीने देण्यात येणारे क्षेत्र | ९९०.०० चौ.मी. |

वरील प्रमाणे बदलास Deed of Exchange साठी व अनुषंगीक प्रशासकीय कामकाजासाठी मा. आयुक्त यांना अधिकार देण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच सदर स्मशानभूमी विकसित करण्याकरिता तयार करण्यात आलेल्या रु. ५०.०० लक्ष रक्कमेच्या अंदाजपत्रकासही प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. केशव घरत.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५० चे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, सुरक्षा रक्षक नेमणेबाबत निविदांना मंजुरी मिळणेबाबत ही दैनिक सुरज प्रकाशला जाहिरात दिली जाते का?

**प्रेमनाथ पाटील :-**

सकाळ ह्या वृत्तपत्रात जाहिरात दिलेली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, एकुण सुरक्षा रक्षक किती आहेत? त्यांना पगार किती दिला जातो? महापालिकेतून त्यांना किती पगार आहे? सुरक्षा रक्षकांची संख्या सांगा.

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त सो.) :-**

मा. सभापती महोदय ह्यांच्या परवानगीने बोलतो. साधारणतः ९० बिन हत्यारी सुरक्षा रक्षक आहेत. ही संख्या कमी जास्त होते. आपल्या गरजेनुसार आपण संख्या वाढवतो. हा टेन्टेटिव्ह आकडा सांगितला आहे. हा एक्झॅक्टली फिगर नाही आणि ७० हत्यारी सुरक्षा रक्षक आहेत. ह्या संख्यांची माहिती घेऊन थोड्या वेळाने आपल्याला नेमकी संख्या किती आहे ते सांगतो.

**मा. सभापती :-**

किती सुरक्षा रक्षक लागतात, त्यापैकी आपण हे दर निश्चित केलेले आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, दर निश्चित केले हे बरोबर आहे. पण आपण आम्हांला संख्या सांगा की, महिन्याला एवढे सुरक्षा रक्षक लागतात. म्हणजे कसा पगार निघतो तेही आम्हांला माहिती मिळू द्या. आपण ६० ठेवत असाल व ९० रक्षकांचा जर पगार देत असाल तर?

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त सो.) :-**

मागच्या वर्षभरात मा. नगरसेवक सुचना करतात की, ह्या शाळेला रक्षक पाहिजे, तळ्याच्या ठिकाणी रक्षक पाहिजे अशा सुचनांमुळे संख्या बरीच वाढलेली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

संख्या वाढली हे बरोबर आहे. आपण आम्हांला आकडा द्या.

**मा. सभापती :-**

सध्या तर संख्या आहे, ती अंदाजित सभेला सांगा.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, शाळांना सुरक्षा रक्षक दिले जातात का?

**प्रेमनाथ पाटील :-**

सुरक्षा रक्षक दिले जातात.

**केशव घरत :-**

आमच्या येथे घोडबंदरला शाळेत सुरक्षा रक्षक दिलेले नाहीत.

**मा. सभापती :-**

मागणी केल्यावर दिले जाते, असे बोलले. महानगरपालिकेच्या ज्या शाळा आहेत किंवा जे गार्डन्स आहेत व सार्वजनिक क्षेत्रामध्ये आपली जेवढी कामे चालतात, बिल्डींग, इमारती आहेत तिथे आवश्यक असेल तर आवश्यक बाब दाखवून, नगरसेवकांनी सुचविले तर तिथे सिक्युरिटी दिली जाते.

**केशव घरत :-**

ठिक आहे.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, सिक्युरिटी शाळेला रात्रीची असते. तर रात्री शाळेमध्ये काय चोरणार आहे?

**मा. सभापती :-**

नगरसेवकांची तशी मागणी असते. तर आपण सांगा की, ही सेवा नाही पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी, तिथे चोरी होत नाही. पण आणखीन दुसरे काहीतरी होते.

**गजानन भोईर :-**

आमच्या येथे १३ नंबरच्या शाळेवर बाटल्या वगैरे चालतात. तिथे भलते व्यवहार चालतात. रात्रीची शाळेवर सिक्युरिटी पाहीजे.

**मिलन पाटील :-**

काही ठिकाणी सिक्युरिटी असतांना चोरी झालेली आहे. त्याला जबाबदार कोण? त्याला सिक्युरिटी जबाबदार राहील का?

**मा. सभापती :-**

जबाबदार ठरेल. त्याची एजन्सी जबाबदार राहील.

**गजानन भोईर :-**

त्याला जबाबदार सिक्युरिटी राहील.

**रिटा शाह :-**

महानगरपालिकेच्या मेन गेटच्या पाठीमागे गाड्या वगैरे उचलनू आणायचे, जे मटेरियल आणायचे त्याच्यामधून भरपूर चोऱ्या झालेल्या आहेत. त्यात लोकांचे म्हणणे असे आहे की, सिक्युरिटीनेच ते काढून घेतलेले आहे, असेही झालेले आहे.

**मिलन पाटील :-**

ब्रिजखालच्या गाड्या पकडून आणतो. त्याची सिक्युरिटीकडे काही नोंद नसते. गाड्या आणल्या की, त्यांच्याकडून पन्नास रुपये घेतो असे ऐकीव आहे आणि ते लोक पाच-पंचवीस रुपये घेतात आणि गाड्या सोडून देतात. तुमच्याकडे नोंद नसल्यामुळे फायदा होत नाही, सिक्युरिटीने ती नोंद घेतली पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

बाराशे रुपये दंड आहे. तर सन्मा. सदस्य पन्नास रुपये कसे बोलतात?

**प्रेमनाथ पाटील :-**

अर्ध्या रस्त्यात पकडले तर दोनशे रुपये घेतात.

**मा. सभापती :-**

अशा बाबतीतील ज्या तक्रारी आल्या असतील, त्या तक्रारी आपण लेखी स्वरुपामध्ये नोंदवून घ्या. म्हणजे त्याच्याकडून तसे पैसे कापता येतील. सन्मा. सदस्यांनी चांगल्या सुचना येथे मांडल्या आहेत. जर अशा बाबतीमध्ये अशा सुचना किंवा तक्रारी आल्या तर त्या तक्रारींची आपण नोंद घ्या. जेव्हा गाड्या किंवा वस्तु उचलतात तेव्हा सन्मा. नगरसेवकांचे बरेच फोन असतात. तेव्हा अधिकारी आयुक्त साहेबांकडे जाऊन बोलतात की, ह्या नगरसेवकांचा फोन आला होता. गाडी कशी सोडायची? साडेबाराशे रुपये कमी होतात. अशी सुचना येते. त्यावेळी आम्ही त्यांना रिक्वेस्ट करतो की, साहेब त्यांची साडेबाराशे रुपये भरण्याची ऐपत नाही. पण जर त्यांनी अशा गोष्टी परस्पर केल्या तर आपल्याला पैसे कापता येतील.

**मिलन पाटील :-**

चुकीची माहिती तुम्हांला मिळालेली आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, चुकीची माहिती मिळालेली आहे. पाचशे रुपये दिले की, लगेच गाडी सोडतात.

**मिलन पाटील :-**

आपण नगरसेवकांचे जे सांगता ते चुकीचे आहे. आता आपण जे हॉकर्सचे जे केलेले आहे, त्याच्यामधून जर बाहेरचा दुसरा कोणी असेल व त्याने जर हप्ता दिला नसेल तर त्याच्या गाड्या येतात. हप्ता दिला असेल त्यांच्या गाड्या येत नाहीत, ते आपण रस्त्यावरही उभा ठेवा, हा मेन मुद्दा आहे. म्हणून नगरसेवक फोन करतात. तुम्ही कशाला गरिबांना त्रास देता? तर ते आपल्याला सांगतात की, बाराशे रुपये मिळत नाहीत. पण मेन मुद्दा म्हणजे त्यांचे हप्ते मिळत नाहीत. येथे हप्तेगिरी चालते हे तुम्हांला माहिती पडते का?

**सुर्यकांत भोईर :-**

कोणाचे किती हप्ते चालतात?

**मिलन पाटील :-**

हे लोक गाडीवाल्यांकडून हप्ते घेतात. ज्यांचा हप्ता आला नाही, त्याची गाडी आतमध्ये.

**मा. सभापती :-**

हप्ते वगैरे बोलू नका. असा विषय कुठे होता?

**प्रेमनाथ पाटील :-**

ट्रकवाले ना?

**मिलन पाटील :-**

ट्रकवाले नाही, हातगाडीवाले, चायनीज गाड्या. आपण मेन रस्त्यावरुन जातो येतो. आपल्याला त्या गाड्या दिसत नाहीत, अधिकाऱ्यांना त्या गाड्या दिसत नाहीत. साहेब, मी सत्य परिस्थिती सांगतो.

**गजानन भोईर :-**

काही लोकांना अगोदर कल्पना मिळते की, आज गाडी उचलायला येणार आहे.

**मिलन पाटील :-**

साहेब, सत्य बोलणारा माणूस हा कडवट असतो. अधिकारी हे मेन रोडवरुन जातात, त्यांना दिसत नाही का? त्या गाडीवाल्यांना आपण परमिशन दिलेली आहे का? त्या गाड्या असतात, तर गरिबांनी कुठे साधे शंभर रुपयाचे आंबे घेऊन विकायला बसले तर त्यांना तुम्ही आतमध्ये घेऊन येता. हा कुठला न्याय आहे? हे अधिकारी असे बोलतात, तर अधिकारी येऊन कमिशनरला सांगतात का? आणि नगरसेवकांचे फोन जातात, ते त्याच्याकरिता नगरसेवकांचे फोन जातात. तो जर त्या नगरसेवकाच्या वॉर्डमधला असेल तर तो नगरसेवकाला सांगणार की, ''यह हमे कितना परेशान करते है।''

**मा. सभापती :-**

आपल्या अशा तक्रारी असतील, त्या आपण लेखी स्वरुपामध्ये द्या.

**मिलन पाटील :-**

साहेब, तक्रारी कोण ओपनमध्ये घेणार का? त्याकरिता आम्हांला ॲन्टी करप्शन आहे आणि ओपनमध्ये असे कोण अधिकारी पैसे घेणार का?

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, असे साडे बाराशे रुपये घेतो. खाली जी सिक्युरिटी उभी असते, गाडीवाले गाडी सोडवालयला आले व त्या सिक्युरिटीकडे जर पाचशे रुपये डायरेक्ट दिले तर वर पावती फाडायची गरज नाही. ते परस्पर देऊन टाकतात अशी आपली सेक्युरिटी आहे.

**मिलन पाटील :-**

कमिशनर साहेबांकडे जाऊन सांगायचे काम म्हणजे काय की, तो अधिकारी चांगले काम करत आहे असे कमिशनर साहेबांच्या निदर्शनास आणून द्यायचे आणि त्यांच्यापुढे ठेवायचे नगरसेवकांना. पण ॲक्च्युअल परिस्थिती काय असते, ह्याची माहिती नगरसेवक ओपन करुन सांगतात, तेव्हा ती परिस्थिती सत्य असते.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मनाळे साहेब, एका वर्षात किती हॉकर्स पकडून आणले, किती सोडले व किती दंड जमा झाला? त्याचा आकडा सांगू शकाल का?

**मा. सभापती :-**

माहिती घेऊन सांगतील. ह्या विषयाची चर्चा नंतर घेऊ.

**जोजफ घोन्सालवीस :-**

एकुण सिक्युरिटीची संख्या किती आहे ते सांगा?

**मा. सभापती :-**

जे रेट दिलेले आहेत ते रेट आपल्याला मंजुर करायचे आहेत आणि ज्या तक्रारी आलेल्या असतील त्या तक्रारी आपण नमुद करा की, तक्रारीचा जो पैसा येईल तो कापून घ्या.

**सुर्यकांत भोईर :-**

ठिक आहे. पण सुरक्षा रक्षकांची संख्या द्या. हत्यारी आणि बिन हत्यारी किती सुरक्षा रक्षक आहेत?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईरजी आपण हा रेट फिक्स करत आहे आणि किती रक्षक पाहिजे त्याची माहिती आपण नंतर घेऊ.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, त्यांना एवढा पगार देऊ शकतो का?

**सुर्यकांत भोईर :-**

येथे आठ तासाचा पगार दिलेला आहे व त्यांना बारा-बारा तास ड्युटी लावतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

जेवढा वेळ काम करणार तेवढा पगार.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य हा गोषवारा संपुर्ण वाचून बघा.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, सिक्युरिटींना आठ तासाची ड्युटी नाही. तर बारा तासाची ड्युटी आहे. त्यांना बारा तासाचा पगार दिला जातो आणि आपण येथे आठ तासाच्या पगाराचे करत आहोत.

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त साो.) :-**

महानगरपालिकेतर्फे आठ तासाच्या हिशोबानेच पगार दिला जातो. जे दर ठरलेले आहेत ते आठ तासाच्या हिशोबाने ठरलेले आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

सैनिक सिक्युरिटीचे जे सुरक्षा रक्षक आहेत ते बारा तास ड्युटी करतात आणि बारा तास ड्युटीचे त्यांना तोच पगार.

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त साो.) :-**

तो एजन्सीचा प्रश्न आहे आणि त्या सिक्युरिटीला किती तास ड्युटी द्यायची?

**सुर्यकांत भोईर :-**

आपण बारा तासाचे नमुद करा.

**रिटा शाह :-**

आपण जो रेट दिलेला आहे तो आठ तासाचा आहे की, बारा तासाचा आहे.

**मा. सभापती :-**

हा रेट आठ तास ड्युटीचा आहे.

(सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील ह्यांनी प्रकरण क्र. ५० चा ठराव सभागृहात मांडला.)

**रिटा शाह :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ५० :-**

सुरक्षारक्षक नेमणेच्या निविदेस मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ५५ :-**

दै. सुरज प्रकाश या वृत्तपत्रात दि. ११/६/२००५ व दै. सकाळ या वृत्तपत्रात दि. १३/६/२००५ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीनुसार महानगरपालिकेचे मालमत्ता संरक्षणाकामी हत्यारी/विनाहत्यारी सुरक्षारक्षक पुरवठा करणाऱ्या कंपन्या / संस्था यांचेकडून खालिल प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्यांचा तपशिल पुढील प्रमाणे.....

| Sr.no. | Name of Agency | Rate Rs. | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Armed | | Unarmed | |
| | | Per day | Monthly | Per day | Monthly |
| **1** | **2** | **3** | | | |
| 1 | रंगी सिक्युरीटी फोर्स, मुंबई | --- | --- | --- | --- |
| 2 | प्रिमीयर सिक्युरीटी फोर्स | 250 | 7500 | 150 | 4500 |
| 3 | सैनिक सिक्युरीटी सर्विसेस, भाईंदर | 170 | 5100 | 135 | 4050 |
| 4 | प्रोटेक्शन फोर्स ऑफ मुंबई | --- | --- | --- | --- |
| 5 | टायगर इंटेलिजन्स सिक्युरीटी | --- | --- | --- | --- |
| 6 | सोल्जर सिक्युरीटी प्रा. लि. पुणे | --- | --- | --- | --- |
| 7 | बगाडे सिक्युरीटी फोर्स प्रा. लि. रायगड | 225 | 8750 | 155 | 4850 |

| Sr.no. | Name of Agency | Rate Rs. | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Armed | | Unarmed | |
| | | Per day | Monthly | Per day | Monthly |
| 1 | 2 | 3 | | | |
| 8 | सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. भाईंदर | 166.63 | 4999 | 133.30 | 3999 |
| 9 | किंग सिक्युरीटी प्रा.लि. रायगड | --- | --- | --- | --- |

वरील प्रमाणे एकूण नऊ निविदा महानगरपालिकेस मुदतीत प्राप्त झालेल्या असून निविदा धारकांनी निविदेसोबत पुढील कागदपत्राची निविदा अटीशर्ती प्रमाणे जोडणे आवश्यक आहे.

१. बायोडेटा, २. वैयक्तिक सुरक्षा रक्षक परवाना, ३. हत्यार प्रशिक्षण केंद्र आहे काय, ४. किमान १५० पेक्षा अधिक सुरक्षा रक्षक पुरवठा केल्याबाबत, ५. मजूर पूरवठा परवाना, ६. कंपनी सुरक्षा रक्षक बोर्डाकडे नोंदणीकृत, ७. आयकर विवरण पत्र (मागील तीन वर्षाचे) ८. व्यवसाय कर, ९. मुम्बई दुकाने व संस्था अधिनियम अन्वये नोंदणी आवश्यक, १०. ESIC/GIS, ११. भविष्य निर्वाह निधी, १२. माजी सैनिकांच्या संस्थेचे प्राधान्य, १३. दर सर्व करांसहीत नमूद करावेत.

वरील अटीशर्तीप्रमाणे तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. ८ मधील सैनिक इंटेलिजेन्स ॲन्ड सिक्युरीटी सर्विसेस यांनी सादर केलेले हत्यारी एका सुरक्षा रक्षकाचा दर महिना प्रति महिना रु. ४९९९/- व प्रति दिन आठा तासासाठी रु. १६६.६३ पैसे असा आहे. तर विना हत्यारी सुरक्षा रक्षकाचा दर प्रति महिना रु. ३९९९/- व प्रति दिन रु. १३३.३० पैसे सादर केला असून महानगरपालिकेने मागणी केलेल्या अत्यावश्यक सर्व कागदपत्राची पुर्तता त्यांनी केलेली आहे.

त्यामुळे मे. सैनिक इंटेलिजेन्स ॲण्ड सिक्युरीटी यांची निविदा ही अन्य भरलेल्या निविदा धारक यांचे पेक्षा कमी दराची व बाजार भावाशी तुलना करता वाजवी असल्याने त्यांची निविदा मंजुर करणेत येत आहे. तसेच मंजूर दराने ठेकेदाराची वेळोवेळी येणारी देयके प्रदानास मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- सौ. रीटा शाह.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. सचिव :-**

मा. सभापती साहेबांनी प्रकरण क्र . ५१ व ५२ नंतर घेण्यांस सांगितले आहे. म्हणून मी प्रकरण क्र. ५३ चे वाचन करत आहे.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५३ चे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, मी मा. महासभेमध्येही बोललो होतो की, आरोग्य खात्याचे जे कर्मचारी आहेत त्यांनी सुट्टीच्या दिवसात काम करायचे व त्यांचा पगार द्या म्हणून सांगितले होते. त्यावेळेला आयुक्त साहेबांनी आणि बावस्कर साहेबांनी सांगितले की, पगार देऊ. पण त्यांना अजुन काही पगार दिला नाही. आज अग्निशमन दल कोर्टात जाऊन त्यांनी दिडपट पगार द्यावा असा आदेश आणला आहे आणि १९९५ साली अटी सेवाशर्ती बनवले आणि त्याच्यामध्ये अकरा नंबर सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी जे कर्मचारी काम करतील त्यांना त्या दिवसाचा मोबदला अतिरिक्त भत्ता द्यावा, अशी आपणच सेवाशर्ती लागू केलेली आहे. तर ह्या लोकांना का नाही? अग्निशमन दलाच्या लोकांबरोबर ह्याही लोकांना द्या आणि जर हे उद्या कोर्टात गेले तर दिडचे दोनपण आणतील.

**मा. सभापती :-**

सध्या विषयपटलावर जो विषय आहे, तो मंजुर करुन घ्या आणि त्यांचा प्रस्ताव सभेसमोर आणा. जसा अग्निशमन दलाचा प्रस्ताव आपल्याकडे आला, त्या प्रस्तावाप्रमाणे आपण हे काम केलेले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ह्याच्याबरोबर आपल्याला माहिती आहे आणि पत्रही आहे आणि ऑर्डरही झाले आहे. तर त्यांना ही देऊन टाका. ह्याच ठरावात त्यांनाही द्या.

**मिलन पाटील :-**

साहेब, हे टॅक्सवाले आपल्याकडे इतर पावत्या निघाल्यानंतर आपण त्यांच्यावर जबरदस्ती करतो, तेवढी वसुली झाली पाहिजे. त्यामुळे ते सुट्टीच्या दिवसात काम करतात. त्यांनी तुमच्याकडे अर्ज केलेला आहे का? टॅक्स डिपार्टमेंटच्या लोकांनी मागणी काय केलेली आहे का?

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त साो.) :-**

टॅक्सच्या कर्मचाऱ्यांनी अद्याप तशी मागणी केलेली नाही.

**मिलन पाटील :-**

अर्ज केलेला आहे आणि मागणी केलेली अशी आमच्याकडे माहिती आहे.

**रमेश मनाळे (मा. सहा. आयुक्त साो.) :-**

टॅक्सच्या कर्मचाऱ्यांनी अशी मागणी केलेली आहे की, आम्हांला इंधन भत्ता मिळावा.

**गजानन भोईर :-**

इंधन भत्ता नसेल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आरोग्य खात्यानेही मागणी केलेली आहे. मा. महासभेमध्येही ते ठरलेले आहे आणि आपणच त्या सेवाशर्ती ठरवलेल्या आहेत.

**गजानन भोईर :-**

मनाळे साहेब, त्यांना आपण रजेचा पगार देत आहोत. तर आरोग्याच्या कर्मचाऱ्यांचाही समावेश करा.

**सुधीर नाकाडी :-**

प्रकरण क्र. ५३ चा जो विषय आलेला आहे, अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांनी सार्वजनिक व सुट्टीच्या दिवशी काम केलेल्या कामाचा मोबदला अदा करणेबाबत. जर आपल्या कर्मचाऱ्यांनी सुट्टीच्या दिवशी काम केले. त्यांना सुट्टीचा मोबदला देण्याची कुठेही तरतुद नाही. तर त्याच्या ऐवजी त्यांना बदली रजा, ज्या आठ रजा ठरलेल्या आहेत त्या सोडून जर ते सुट्टीच्या दिवशी काम करतात, तेवढ्या त्यांना बदली रजा मिळू शकते. पण मोबदला देण्याची प्रोव्हिजन नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, पण कर्मचारी वर्ग कमी असेल तर त्यांना कुठे सुट्टी मिळेल?

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण अटीशर्ती बघा. मोबदला द्यायचा, अतिरिक्त भत्ता द्यायचा असे आहे.

**सुधीर नाकाडी :-**

अतिकालीन भत्ता द्यायचा तो वेगळा आहे. अतिकालीन भत्ता म्हणजे ओव्हर टाईम. अतिकालीन भत्ता म्हणजे सुट्टीच्या दिवसाचा पगार नव्हे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सुट्टीच्या दिवसाचा पगार असे त्याच्यामध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे व सुट्टीच्या दिवशी काम केलेल्याचा त्याच्यमध्ये उल्लेख आहे का नाही?

**सुधीर नाकाडी :-**

सुट्टीच्या दिवशीचा आहे. पण त्याच्यामध्ये बदल झालेला आहे. शासनाने फक्त पोलिस डिपार्टमेंट सोडून बाकी कोणत्याही डिपार्टमेंटला मोबदला दिला जात नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

अग्निशमन दलाने कोर्टाची ऑर्डर आणलेली आहे.

**मा. सभापती :-**

अग्निशमन दलाबाबत बोलत नाही. इतर आरोग्य विभाग व कर विभागाच्या विषयाबाबत ते बोलत आहेत.

**सुधीर नाकाडी :-**

आरोग्य विभागाचे व कर विभागाचे कर्मचारी आहेत त्यांना देता येत नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीसजी व मिलन पाटीलजी आपले जे कर अधिकारी आहेत आणि आरोग्याचे जे कर्मचारी आहेत. त्याच्याविषयी विषय आणल्यानंतर त्याबद्दलचा खुलासा करण्यासाठी आपण त्यांना सांगितले आहे व त्यांनी खुलासा केलेला आहे व ह्या बाबतीमध्ये आरोग्य विभाग व कर विभागाबद्दल त्यांच्या खात्याकडून माहिती घेऊन आपण पुढच्या वेळेला विषय आणून त्याच्यावर सविस्तर चर्चा करुन आपणांला जी मंजुरी शासनाच्या नियमाला अधिन राहून देता येईल, त्याचा प्रस्ताव आपण पुढच्या सभेला आणू.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पुढच्या सभेला हा कुठल्याही परिस्थितीत आला पाजि. नाहीतर, उद्या हे कोर्टात जातील. त्यात नामुष्की आहे ना!

**मा. सभापती :-**

ह्याच्याबरोबर कर विभाग, आरोग्य विभाग व वन विभाग.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती महोदय, प्रथमतः सर्व सदस्यांच्या वतीने आपल्याला धन्यवाद देतो. जी गोष्ट गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित होती, ती गोष्ट कुठेतरी मार्गी लागलेली आहे. शहरातील अत्यावश्यक सेवा जे

अग्निशमन दल कार्यरत आहे, बरेचसे कर्मचारी ह्या दलात काम करण्यांस इच्छुक नसतात. कारण त्यांना अखंडीत चोवीस तास सेवा करावी लागते. त्यामुळे हा विषय आपण विषयपटलावर घेतला, त्याबद्दल आपणांला धन्यवाद व्यक्त करतो. सन १९९५ पासून २००३ सालापर्यंत अशा कर्मचाऱ्यांनी अतिरिक्त सुट्टीच्या दिवशी काम वगैरे केलेले असेल त्यांचा मोबदला अदा करण्याचा नियमामध्ये प्रयोजन आहे.

(सन्मा. सदस्य श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ५३ चा ठराव सभागृहात मांडला.)

**प्रेमनाथ पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सचिवजी, पुढच्या सभेला आरोग्य खात्याचा विषय घ्या.

**गजानन भोईर :-**

कर विभागाचा विषयदेखील घेण्यांत यावा.

**प्रकरण क्र. ५३ :-**

अग्निशामक दलातील कर्मचाऱ्यांनी सार्वजनिक व सुट्टीच्या दिवशी काम केलेल्या कामाचा मोबदला अदा करणेबाबत.

**ठराव क्र. ५६ :-**

अग्निशमन दल हे अत्यावश्यक सेवा असून २४ तास कार्यरत राहणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे अग्निशमन दल २४ तास कार्यरत असते. परंतु, सदर विभागातील कर्मचारी वर्ग अपुरा असल्यामुळे सार्वजनिक व शासकीय सुट्टीच्या दिवशीही कर्मचाऱ्यांना कामकाज करावे लागते. ह्या दिवशी केलेल्या कामाचा मोबदला कर्मचाऱ्यांना मिळत नाही. अग्निशमन दलात फक्त ११ पदे मंजूर आहेत. उर्वरीत कामगार हे सफाई कामगार व मजुर ह्या पदावर काम करीत आहेत. मुख्य कार्यालयात काम करणाऱ्या सफाई कामगार किंवा मजुर ह्या कर्मचाऱ्यांना सर्व शासकीय व सार्वजनिक रजा उपभोगता येतात. परंतु, अग्निशमन दल अत्यावश्यक सेवा असल्याने २४ तास कार्यरत राहणेसाठी अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना आपले काम चोखपणे पार पाडावे ह्याकरिता प्रशासनातील अधिकारी व नगरसेवक अपेक्षा बाळगून असतात. अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांना काम करण्यास स्फुर्ती मिळावी म्हणून आपण त्यांना शासकीय व सार्वजनिक रजेच्या दिवशी केलेल्या कामाचा मोबदला दिल्यास इतर विभागातील कर्मचारी सुद्धा अग्निशमन दलात काम करण्यास पुढे येतील.

तरी अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांनी सार्वजनिक व शासकीय सुट्टीच्या दिवशी काम केलेल्या कामाचा मोबदला म्हणून (सन १९९५ ते डिसेंबर २००३) पर्यंतची रक्कम रुपये १५,९१,२०३/- एवढी अदा करणेस मंजुरी देत आहे. तथापी धोरणात्मक बाब म्हणून मान्यतेसह महासभेस शिफारस करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५४ चे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

ह्या ठरावाला मंजुरी आहे. पण स्ट्रीट लाईटकरिता आपल्या येथे कोण कोण माणुस फिरतो? आपण स्ट्रीट लाईटचे नुसते पैसे भरतो. पण त्याचे लाईट लागलेले आहे किंवा नाही ते पाहत नाही. आता एवढी हवा सुटली. त्यामुळे कितीतरी पोल पडलेले आहेत. ते पोल लावणार आहात की, नाही लावणार? काय करणार आहेत? ह्याचे उत्तर द्यायला कोण अधिकारी आहे? सभापती साहेब, आपण पैसे भरतो. पण नाहक बचत करायला पाहिजे का नको? जर समजा कुठे आवश्यक बाब असेल तर ती गोष्ट वेगळी आहे. जर आवश्यकत नसेल तिथे लाईट लागते व त्याचे पैसे आपण भरतो.

**दिपक खांबित :-**

जे पोल चालू आहेत, त्याचेच पैसे भरले जातात. लाईट लागलेले नाही, त्याचे पैसे कुठे भरतो? जे साडेसात हजार आपले पोल आहेत त्याचेच पैसे भरतो. पोल नाही, त्याचे पैसे कसे भरणार?

**मिलन पाटील :-**

पोल आहेत, पण लाईट चालू नाही. मुर्धा येथे मी कितीतरी पोल बघितले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी तक्रार नोंदवा. तक्रार केल्यानंतर लाईट चालू होईल.

**दिपक खांबित :-**

तक्रार दिल्यानंतर तीन दिवसामध्ये लाईट चालू होते. साहेब, हा जो विषय आहे, जिथे रिलायन्सवाले स्ट्रीट लाईट लावत नाही. तिथे एस्टीमेट केलेले आहे. त्याच्यामध्ये पाली चौकमध्ये आठ लाख छपन्न हजाराचे एस्टीमेट केलेले आहे. उत्तन गावामध्ये चौदा लाख सत्तर हजाराचे, डोंगरी-तारोडीमध्ये तेरा लाख एक्याऐशी हजाराचे, राई-मोर्वामध्ये अकरा लाखाचे, घोडबंदर गावांत अकरा लाख एकोणपन्नास हजार. जिथे तीन मीटर जास्त-कमी रुंदीचे रस्ते आहेत तिथे करायचे आहे. मुर्धा गांव, मुर्धा खाडीचे आहे, नवघर गाव इंदिरा नगरचे आहे, पेणकर पाड्यामधले आहे, काशिगांव, जनता नगर, मिरा गांवचे आहे व जनता नगर, मोतीनगर, जय अंबे नगर इथले आहे.

**गजानन भोईर :-**

गोडदेवला ह्याच्यातून वगळलेले आहे का?

**दिपक खांबित :-**

ते ह्याच्यामध्ये आहे. जिथे बी.एस.ई.एस.ची गाडी जात नाही व जिथे छोट्या गल्ल्या आहेत तिथे आपण स्ट्रीट लाईट लावायचे आहे.

**कैलासबेन जानी :-**

सभापती साहेब, माझी एक अशी सुचना आहे की, शाळा सुरु झालेली आहे आणि अनुदानाचा जो विषय आहे. तो पुढच्या सभेत आणा.

**गजानन भोईर :-**

ज्या कोणत्या शाळेला जे काही द्यायचे असेल ते देण्यांत यावे.

(सन्मा. सदस्य श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ५४ चा ठराव सभागृहात मांडला.)

**मॉरस रॉड्रीक्स / केशव घरत :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ५४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ३ मीटर पेक्षा कमी रुंदीच्या गल्ल्यांना महानगरपालिकेतर्फे स्ट्रीट लाईट बसविणेबाबत.

**ठराव क्र. ५९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी ३ मीटरपेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यांवर मे. रिलायन्स एनर्जी लि. च्या पॉलिसीनुसार सदर ठिकाणी स्ट्रीट लाईट पोल लावण्यात येत नाहीत. परंतु सदर ठिकाणी स्ट्रीट लाईट लावण्याबाबत मा. नगरसेवक, नगरसेविका तसेच नागरिक वारंवार तक्रार करतात. सदर ठिकाणी महानगरपालिकेतर्फे स्ट्रीट लाईट पोल लावण्याबाबत खालील प्रमाणे सर्व्हे करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | भाईंदर पश्चिम जनता नगर मोती नगर गणेश देवल नगर जय अंबे नगर १ व २ येथे स्ट्रीट पोल लावणे. | रु. ४५,३७,३१४/- |
| २ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील जनता नगर झोपडपट्टी अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल लावणे. | रु. २९,९८,४८५/- |
| ३ | पेणकर पाडा अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल लावणे. | रु. ५०,००,०००/- |
| ४ | नवघर गाव इंदिरा नगर अंतर्गत स्ट्रीट लाईट पोल लावणे. | रु. २०,११,९८६/- |
| ५ | मुर्धा गाव, खाडी येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. | रु. ३५,५३,७२२/- |
| ६ | घोडबंदर गाव येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. | रु. ११,४९,४६२/- |
| ७ | राई मोर्वा गाव येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. | रु. १०,९९,७०१/- |
| ८ | डोंगरी तारोडी गाव येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. | रु. १३,८१,६८०/- |
| ९ | उत्तन गाव येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. | रु. १४,७०,३१५/- |
| १० | पाली चौक गाव येथे स्ट्रीट लाईट पोल लावणे. | रु. ८,५६,७१०/- |

तरी वरील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली असून सदर स्ट्रीट लाईट करीता अर्थसंकल्पात तरतूद करुन महानगरपालिकेतर्फे निविदा काढून करण्यास व रिलायन्स कडून मीटर घेऊन येणाऱ्या खर्चास व मासिक देयक प्रदान करण्यास तसेच सर्व अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. केशव घरत.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**

**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५५ चे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

ही चांगली संस्था आहे.

**मिलन पाटील :-**

ही चांगली संस्था व चांगली गोष्ट आहे.

(सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील ह्यांनी प्रकरण क्र. ५५ चा ठराव सभागृहात मांडला.)

**मिलन पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ५५ :-**

अनामिक मद्यपि (अे.अे.) सभांसाठी जागा मिळणेबाबत.

**ठराव क्र. ६० :-**

अल्कोहोलीक्स अनॉनिमस (अे.अे.) ही संस्था नागरिकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत प्रचार करणारी सेवाभावी संस्था आहे. या संस्थेचे मुंबईमध्ये साधारणतः १६० ग्रुप आहेत. ही संस्था मिरा भाईंदर परिसरामध्ये विविध शाळांमध्ये ठराविक दिवशी नागरिकांच्या अनामिक सभा (अे.अे.) घेऊन नागरिकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करीत आहेत व याबाबत ते कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारत नाहीत. त्यांनी दि. ०२/०५/२००५ रोजीच्या पत्रान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका मराठी शाळा, तलाव रोड येथील एक वर्ग, बुधवारी व शनिवारी सायं. ०७.०० ते ०९.०० या दरम्यान अनामिक सभा (अे.अे.) घेणेसाठी उपलब्ध करुन देणेबाबत किमान विजेचे बिल, मेन्टेनन्स खर्च भरुन वापरण्याकरिता मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५६ चे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, सर्वानुमते ठराव मंजुर.

**केशव घरत :-**

सभापती साहेब, माझा असा प्रश्न आहे की, अगोदर साहित्य कोण देत होते?

**सुर्यकांत भोईर :-**

आपणच (महानगरपालिका) देत होती.

**केशव घरत :-**

मग हा ठराव ह्याच्यात का आला?

**सुर्यकांत भोईर :-**

गेल्या वेळेलाही ठराव आलेला.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रत्येक वर्षी येतो.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, याबाबत शिक्षण अधिकाऱ्यांकडून माहिती घ्या. वर्गपटलावर किती मुले आहेत? विद्यार्थी संख्या का कमी आहे? त्याबाबत विचारणा करा.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, शिक्षण अधिकाऱ्यांना वाहन आहे का?

**गजानन भोईर :-**

नवघर शाळेतील एकोणीस मुले शाळा सोडून गेली, त्याला कारण काय?

**सुर्यकांत भोईर :-**

आमच्या विभागातून शाळेतून कमीत कमी सहा मुलांनी शाळा सोडून गेलेले आहे. चौथी पास झाल्यानंतर पाचवीकरिता माध्यमिक शाळेत प्रवेश घेतात. तर प्रवेश का घेतात?

**ए. के. संन्याशिव (शिक्षण अधिकारी) :-**

खाजगी शाळेचे वर्चस्व जास्त असल्या कारणाने, आपल्या मिरा भाईंदर शहरातच नव्हे तर प्रत्येक महानगरपालिकेतील शाळेत विद्यार्थी संख्या कमी होत आहे. आपण पेपर वाचत असाल तर मुंबई महानगरपालिकेच्या दहा शाळा बंद झालेल्या आहेत. ही परिस्थिती आहे. जेव्हा मुले मिरा भाईंदरच्या शाळेत प्रवेश घेतात....

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, मिरा भाईंदरच्या प्राथमिक शाळेमध्ये इंग्रजी शिक्षण बरोबर दिले जात नाही.

**ए. के. संन्याशिव (शिक्षण अधिकारी) :-**

आपल्या येथे आता पहिलीपासून इंग्रजी शिकवले जाते.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, हे विद्यार्थी कमी होण्याचे कारण काय? तर आपले शिक्षण शिकविण्याचा दर्जा चुकीचा आहे का? म्हणजे शिक्षक बरोबर नाहीत का? मुलांना शिकविण्याची पद्धत प्रायव्हेट स्कुलपेक्षा वेगळी आहे का?

**ए. के. संन्याशिव (शिक्षण अधिकारी) :-**

शिक्षणाचा दर्जा हा......

**प्रेमनाथ पाटील :-**

महानगरपालिकेचा दर्जा घसरलेला आहे. पण प्रायव्हेट शाळेचा दर्जा अजून घसरलेला नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

हे आपण मान्य करा. जर शाळा सातची असेल तर टीचर आठ वाजता येतात आणि आल्यानंतर गप्पागोष्टी करत बसतात.

**गजानन भोईर :-**

नवघर शाळेतून मुले ह्याच्याकरिता गेली की, शाळेत जायला त्यांना रस्ता नाही. सभापती साहेब, आपण १३ नंबरच्या शाळेत गेला होतात का?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. शिक्षण अधिकारी त्या ठिकाणी गेले होते का, ते पहिल्यांदा विचारा.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, आपण १३ नंबरच्या शाळेत गेला होतात का? दोन्ही पॅन्टला हात लावून गेला होता का? पॅन्ट वर चढून गेला होतात का?

**ए. के. संन्याशिव (शिक्षण अधिकारी) :-**

मागच्या वर्षी तिथे भरणी केली होती व ह्याबाबत खांबित साहेबांना सांगितले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

चालू वर्षाचे सांगा.

**गजानन भोईर :-**

मागच्या वर्षी भराव टाकला नव्हता. फक्त महापौर चषक चालू होते, त्याकरिता माती टाकली होती. स्पेशल येण्या-जाण्याकरिता भराव टाकला नाही.

**दिपक खांबित :-**

कालच आयुक्त साहेबांनी मंजुरी दिलेली आहे.

**गजानन भोईर :-**

ह्याच्या अगोदर एक वर्षात तिथे तुम्ही भराव टाकलेला आहे का? तर नाही टाकला.

**दिपक खांबित :-**

भराव टाकला नाही व टाकायची आवश्यकताही नाही.

**गजानन भोईर :-**

जर भराव टाकायची आवश्यकत नाही, तर रस्ता बनवा.

**मिलन पाटील :-**

संन्याशिव साहेब, सरकारचे धोरण होते, जी ढ मुले आहेत त्यांना पुर्नअवलोकनाकरिता मे महिन्यामध्ये क्लास घ्यायचे. त्या मुलांना शाळेत घेऊन यायचे, त्यांना शिकवायचे आणि त्यांची पुन्हा परिक्षा घ्यायची. तर आपल्या येथे असे काही घडलेले नाही.

**ए. के. संन्याशिव (शिक्षण अधिकारी) :-**

लेखन-वाचन हा कार्यक्रम आपल्याकडे झाला व तो चांगल्या प्रकारे यशस्वी झालेला आहे.

**मिलन पाटील :-**

ह्या कार्यक्रमाला किती मुलं आलेली होती?

**ए. के. संन्याशिव (शिक्षण अधिकारी) :-**

लेखन वाचन कार्यक्रमामध्ये एकुण ४९८ मुले होती. त्या बैठकीमध्ये सन्मा. नगरसेवकांनाही सहभागी केलेले आहे आणि घोडबंदर येथे मा. महापौर ह्यांच्या हस्ते उद्‌घाटन केले आणि चांगल्या प्रकारे कार्यक्रम झालेला आहे.

**मिलन पाटील :-**

किती विद्यार्थी ह्या कार्यक्रमामध्ये होते?

**ए. के. संन्याशिव (शिक्षण अधिकारी) :-**

४९८ विद्यार्थी होते.

**मिलन पाटील :-**

म्हणजे दर्जा किती खालावलेला आहे.

**ए. के. संन्याशिव (शिक्षण अधिकारी) :-**

आपल्या येथे त्या मानाने विद्यार्थी संख्या कमी आहे.

**मिलन पाटील :-**

सर्व शाळांचे मिळून ४९८ विद्यार्थी म्हणजे किती टक्के झाले, ते सांगा.

**ए. के. संन्याशिव (शिक्षण अधिकारी) :-**

टक्केवारी ही कमीच येते.

**मिलन पाटील :-**

म्हणजे किती?

**ए. के. संन्याशिव (शिक्षण अधिकारी) :-**

१० टक्के सुद्धा होत नाही. साडे नऊ हजार विद्यार्थी आहेत. त्यापैकी ४९८ विद्यार्थी हजर होते.

**गजानन भोईर :-**

संन्याशिव साहेब, आपण आता वक्तव्य केले की, मुंबई महानगरपालिकेच्या दहा शाळा बंद पडल्या आहेत. आपण असे दाखवा ना, त्या शाळा बंद पडल्या, पण आपल्या मिरा भाईंदरच्या शाळा चालू आहेत. जर आपल्या इथल्या शाळा बंद पडल्या तर तुम्ही कुठे बसणार?

**ए. के. संन्याशिव (शिक्षण अधिकारी) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळेत विद्यार्थी संख्या वाढत आहे.

**गजानन भोईर :-**

विद्यार्थी संख्या वाढत नाही, तर संख्या कमी झालेली आहे.

**ए. के. संन्याशिव (शिक्षण अधिकारी) :-**

नाही, यावर्षी संख्या वाढलेली आहे.

**गजानन भोईर :-**

नवघरच्या शाळेतील एकोणीस मुले शाळा सोडून गेलेली आहेत, ह्याची मी तुम्हांला माहिती देतो.

**ए. के. संन्याशिव (शिक्षण अधिकारी) :-**

जर नवघर शाळेत मुले कमी झालेली असली तरी दुसऱ्या शाळेत मुले वाढलेली आहेत.

**गजानन भोईर :-**

कुठल्या शाळेत मुलांच्या संख्येत वाढ झालेली आहे ते सांगा. सन्मा. सदस्य केशव घरतजी आपल्या येथील शाळेत मुलांच्या संख्येत वाढ झालेली आहे का?

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, प्रत्येक वर्षी दहा-बारा मुलं आमच्या शाळेतून कमी होत आहेत. चौथी पास झाल्यानंतर पाचवीकरिता माध्यमिक शाळेत ॲडमिशन घेतात. ह्याचा अर्थ शिक्षण बरोबर नाही. मुलांवर तुमचे लक्ष नाही.

**ए. के. संन्याशिव (शिक्षण अधिकारी) :-**

तसे म्हणता येणार नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

आम्ही असे ऐकीवात आहे की, तुम्ही खाजगी शाळांमध्ये जास्त लक्ष देता.

**ए. के. संन्याशिव (शिक्षण अधिकारी) :-**

खाजगी शाळांमध्ये कसे जास्त लक्ष देणार?

**गजानन भोईर :-**

आपल्या महानगरपालिकेच्या शाळेतन जर ती मुले पास होऊन सातवीमधून दुसऱ्या शाळेत जातात. तर त्यांच्याकडून डोनेशन घेतले जाते. कृपया ह्याच्यावर बंदी आणा. जेणेकरुन मुलांचे डोनेशन दोन ते चार हजार रुपये जाणार नाही. महानगरपालिकेच्या शाळेतून शिकलेली मुले आहेत आणि खाजगी संस्था त्यांच्याकडून डोनेशन घेते.

**मा. सभापती :-**

मागच्या वेळेला आम्ही तो विषय आणला होता आणि सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईरजी, ह्या वेळेला आपल्या विद्यार्थी संख्येत वाढ झालेली आहे. सर्व्हे केला आहे. मुलांना जे गणवेश देणार आहोत, तो विषय

मा. महासभेपुढे येणार आहे.  त्यावेळी सर्व्हे केला असता, त्याता आपल्याला वाढ मिळालेली आहे.  म्हणजे विद्यार्थी संख्या वाढलेली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

कागदोपत्री का?

**मा. सभापती :-**

कागदोपत्री नाही, प्रत्यक्षात.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण बघितले आहे का?

**मा. सभापती :-**

बघितल्यानंतर सर्व्हे रिपोर्ट आलेला आहे.  त्याच्यामध्ये वाढ झालेली आहे.  म्हणजे मुलांच्या गणवेशाकरिता जो सर्व्हे केला त्यात वाढ झालेली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

मुलं जेव्हा शाळेतून नांव काढायला जातात, तर शाळेचे शिक्षक हे मुलांना दाखले देत नाही. संन्याशिव साहेबांना मी ह्याबाबत फोन केलेला आहे.

**केशव घरत :-**

हे बरोबर आहे.

**मा. सभापती :-**

खाजगी शाळेमध्येसुद्धा तीच पद्धत आहे.  नांव काढायला देत नाही.  कारण वर्ग कमी होतील.

**सुर्यकांत भोईर :-**

तोही पट पकडला जातो ना?

**मा. सभापती :-**

ह्याकरिता मागच्या वेळेला मी बोललो होता की, आपल्याकडे माध्यमिक विभाग सुरु केले पाहिजे, तर का?  ज्युनिअर के.जी. व सिनिअर के.जी. चालू केले तर त्या मुलांचा पाया चांगला मजबूत होईल.  तसेच सन्मा. सदस्य गजानन भोईरजी ह्यांनी सांगितले की, डोनेशन घेतले जाते.  म्हणजे आठवी, नववी व दहावी हे वर्ग जर सुरु केले, माध्यमिक क्षेत्रामधून सुरु केले तर तेही आपले डोनेशन वाचेल.  परंतु, मुलभूत शिक्षण मंडळ स्थापन न झाल्यामुळे जे प्रायमरी शिक्षक पहिली ते सातवीपर्यंत आहे, ते शिक्षण मंडळ सुरु न झाल्याने तो विषय नंतर घेणार आहोत आणि किमान सर्व शाळांमध्ये माध्यमिक शाळा सुरु होऊ शकणार नाही. समजा, नवघर शाळा आहे.  त्या ठिकाणी विद्यार्थ्यांचा जास्त ओघ आहे.  भाईंदर पश्चिमेला थोडासा ओघ कमी आहे.  म्हणून प्रायोगिक तत्त्वावर भाईंदर पुर्वेला जर आपण शाळा सुरु केली, तर आपल्याला त्या ठिकाणी अनुभव येईल.  म्हणून शिक्षण मंडळ स्थापन होणे हे अत्यावश्यक बाब आहे.  शिक्षण मंडळानंतर जर आपण माध्यमिक शाळा सुरु केली तर आपला पाया मजबुत होईल.  ज्युनिअर के.जी. व सिनिअर के.जी. सुरु केल्यानंतर.  कारण खाजगी शाळेमध्ये ज्यनिअर के.जी. व सिनिअर के.जी. आहे आणि आपल्या शाळांमध्ये नाही.  त्यामुळे आज महानगरपालिकेचा विद्यार्थी पुढे यत नाही, असा आपला अनुभव आहे.

**केशव घरत :-**

शिक्षण मंडळ व्हावे म्हणून मी अगोदर पहिल्याच सभेला सांगितले होते.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती महोदय, अत्यावश्यक असे आपणांला विचारु इच्छितो की, मागे केरळमध्ये शाळेला आग लागून घटना घडली होती आणि त्या घटनेमध्ये बरेचशी मुले मृत्यूमुखी पडली होती.  तर राज्य शासनाचे शिक्षण मंडळाला तशा प्रकारचे निर्देश निर्गमित केलेले आहेत.  त्यांनी स्वतःची प्रतिबंधक योजना राबवावी ह्याबाबत शिक्षण अधिकाऱ्याला खुलासा विचारा की, अशा पद्धतीचे निर्देश शासनाचे प्राप्त झालेले आहेत का नाही?

**ए. के. संन्याशिव (शिक्षण अधिकारी) :-**

शासनाचे निर्देश आले होते की, त्यानुसार आपल्या महापालिकेच्या वतीने शाळेला इसमाना दिला होता की, शाळेपासून दूर असावे आणि खाजगी शाळेच्या बाबतीत अंतर दिले होते की, शाळेपासून १०० फुटाच्या अंतरावर खिचडी बनविण्याची कार्यवाही व्हावी.

**हॅरल बोर्जीस :-**

खिचडीचा विषय नव्हता.

**ए. के. संन्याशिव (शिक्षण अधिकारी) :-**

हा तोच विषय होता.

**गजानन भोईर :-**

जर शॉर्ट सर्किटचा विषय आला व शॉर्ट सर्किटने जर झाले त्याच्यासाठी शाळेकडे उपाययोजना काय?

**ए. के. संन्याशिव (शिक्षण अधिकारी) :-**

जे खाण्याचे आहे त्या बाबतीमध्ये मार्गदर्शन केलेले आहे.

**गजानन भोईर :-**

ते शिक्षण आपण कोणाला दिलेले आहे का? आपण जर एका शाळेत गेलो आणि सांगितले की, हे करुन दाखव तर ते करुन दाखवायला तयार आहेत. आपण एकाच शाळेला भेट देऊ या.

**मा. सभापती :-**

हा चांगला विषय आहे. याकरिता आपल्याकडे अग्निशमन दलाचा पथक आहे. श्री. क्लासोजी, आपण मिरा भाईंदर शहरातील जेवढ्या शाळा आहेत. त्यांना प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीकोनातून आपण पुढाकार घ्यावा आणि आपल्यामार्फत सर्व शाळांना सुचित केल्यानंतर काय केले पाहिजे? त्याचा प्रस्ताव आणावा आणि तसे करण्यांत यावे.

**प्रकरण क्र. ५६ :-**

महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना सहामाही परिक्षा २००४ च्या परिक्षेस लागणाऱ्या प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका तसेच आवश्यक ते साहित्य छपाई करणेबाबत.

**ठराव क्र. ६१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या एकूण २९ विविध प्राथमिक माध्यमाच्या शाळा असून महानगरपालिका शाळेत शिक्षण घेणारे बहुसंख्य विद्यार्थी गोरगरिब व आर्थिक दृष्ट्या कमकुवत गटातील आहेत. सदर विद्यार्थ्यांना परीक्षेकरिता उत्तरपत्रिका व इतर आवश्यक साहित्य छपाई करून मोफत देणेबाबत दि. १७/९/२००४ च्या सकाळ या वृत्तपत्रातून निविदा खालीलप्रमाणे प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | छपाईचा तपशील | साईज | विपुल असोसिएट | गणेश प्रिंटर्स |
|---|---|---|---|---|
| १ | इ. १ ली ते इ. ७ वी प्रश्नपत्रिका (पाठपोठ) प्रतिपेज (मराठी, हिंदी, गुजराती, उर्दु माध्यम) | ए-४ | ०.५२ पैसे | ०.५८ पैसे |
| २ | उत्तरपत्रिका १२ पानी(पाठपोठ) प्रतिहजारी | नमुन्याप्रमाणे | रू. ७५०/- | रू. ७१०/- |
| ३ | पुरवण्या ४ पानी(पाठपोठ) प्रतिहजारी | नमुन्याप्रमाणे | रू. २९०/- | रू. २७५/- |

निविदेनुसार तुलनात्मक दरपत्रक पहाता मे. विपुल असोसिएट्स, विरार (प.) यांची अनुक्रमांक १ प्रमाणे निविदा सर्वात कमी आहे. तसेच तुलनात्मक दरपत्रक पहाता मे. गणेश प्रिंटर्स, नवी मुंबई यांची अनुक्रमांक २ व ३ प्रमाणे निविदा सर्वात कमी आहे. तरी सर्वात कमी दराची निविदा स्विकारणेस ही स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. केशव घरत.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५७ चे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

सभापती साहेब, महिलांचा प्रश्न आहे. आपण अगोदर महिला व बालकल्याण समितीमार्फत शिलाई मशिनचे वाटप करणार होतो. त्या मशिनचे वाटप झाले का? पाच-सहा महिने झाले असतील हा ठराव मंजुर करुन देऊन. प्रत्येक नगरसेवकांना वाटप करण्यासाठी तीन-तीन शिलाई मशिन देणार होता. त्या दिल्या का?

**दामोदर संख्ये :-**

शिलाई मशिनची ऑर्डर दिलेली आहे. त्या मशिन आल्यावर ताबडतोब वाटप करण्यांत येईल.

**मा. सभापती :-**

निविदा मंजुरीला आपल्यासमोर येणार आहे आणि त्या पद्धतीने त्याची सर्व प्रोसिजर पुर्ण झालेली आहे आणि आपल्या पद्धतीने नगरसेवकांची जी मागणी असेल.........

**गजानन भोईर :-**

कोणाकोणाचे नांव आहे त्याची लिस्ट आम्हांला मिळाली पाहिजे.

**मा. सभापती :-**

लिस्ट देण्यांत येईल.

**कैलासबेन जानी :-**

सभापती साहेब, प्रशिक्षण देणार तर ते कुठे देणार? प्रशिक्षणाचा हा जो एक वर्ग चालला तर परत कधी प्रशिक्षण चालू करणार व कोणाला शिकवणार आहे? त्याबद्दल काय विचार केलेला आहे का?

**दामोदर संख्ये :-**

भाईंदरला देणार.

**कैलासबेन जानी :-**

नगरभवनमध्ये प्रशिक्षण देणार का?

**हॅरल बोर्जीस :-**

श्री. संख्ये, प्रशिक्षणाच्या बाबतीमध्ये बऱ्याचशा मुलांनी तुमच्याकडे अर्ज केलेला आहे. काही तांत्रिक अडचणीमुळे ते प्रशिक्षण आपण एप्रिल-मे महिन्यामध्ये करु शकला नाहीत. तर अजुनही तुम्हांला अशी काही तांत्रिक अडचण आहे का? जेणेकरुन हे प्रशिक्षण चालू झाले नाही. कारण आता दिवाळीमध्ये हे प्रशिक्षण जास्त चांगल्या प्रकारे राबविता आले पाहिजे. त्याकरिता तुम्हांला अजुन काही तांत्रिक अडचणी आहेत का?

**दामोदर संख्ये :-**

दिवाळीपर्यंत चालू करण्यांत येईल.

**हॅरल बोर्जीस :-**

म्हणजे आपल्याला तांत्रिक अडचण काहीच नाही ना?

**कैलासबेन जानी :-**

जास्तीत जास्त मुलांना प्रशिक्षण देता येईल असे करा. आपण काही मुलांचे फॉर्म कॅन्सल करता. आता पुरते झाले असे म्हणून त्यांना घेता येणार नाही. आता पुढच्या वर्षी घेऊ असे आपण त्यांना उत्तर देता.

**रिटा शाह :-**

साहेब, महत्वाची गोष्ट अशी आहे की, तुमच्याकडे आता जे फॉर्म येऊन पडलेले आहेत. तुमची काहीतरी अडचण होती म्हणून आपण ते पेन्डींग ठेवलेले आहे. तर आपण त्यांना प्रायोरिटी देणार ना?

**कैलासबेन जानी :-**

असे प्रशिक्षण घ्यायला जर कोणी आले तर आपण त्यांना प्रोत्साहन द्यायला पाहिजे व सांगायला पाहिजे की, असे आहे. आता नाही, आपण दोन महिन्यानंतर या, तुम्हांला घेऊ असे त्यांना सांगायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

दहा लाखाचे प्रयोजन ठेवलेले आहे आणि जर तुमच्याकडे जास्त मागणी वाढली तर पुन्हा तुम्हांला तो विषय आणावा लागेल. तो विषय पुन्हा आणण्याऐवजी आत्ताच आपण त्याचा निकष ठरवून घ्या, काय असेल ते. तरतुदी शिल्लक आहे. तरतुदप्रमाणे करा. फिगर टाकू नका.

**मिलन पाटील :-**

श्री. संख्ये आपण जे फिनेल, झाडू सामान वगैरे बनविण्याकरिता अशा लोकांना आपण दिले आहे. त्या लोकांकडून महानगरपालिकेने काही वस्तु खरेदी केलेल्या आहेत का?

**दामोदर संख्ये :-**

आपण त्यांना काम देतो.

**मिलन पाटील :-**

देत नाही. त्यांनी आपल्याला काय सामान खरेदी करुन दिलेले आहे का? अजुन त्या बाबतीमध्ये कर्ज घेतलेले नाही व आपल्याला त्या वस्तु दिलेल्या नाहीत. तुम्ही कोणाला असे उत्तेजित केलेले आहे का? आपण वस्तु बनवा, काय करा?

**केशव घरत :-**

सभापती महोदय, वस्तु बनवायचे आहे. पण बँक लोन देत नाही, त्याचे काय? तो विषय आपण पहिल्यांदा घ्या. सभापती महोदय, हा जो विषय आलेला आहे, त्यांना प्रशिक्षण द्यायचे आहे व त्यांना व्यवसाय सुरु करायचा आहे. परंतु, बँक लोन देत नाही, त्याचे काय?

**मा. सभापती :-**

बँकेची जी पॉलिसी आहे, किमान बँकांना असे वाटते की, काही लोक लोन पेड करणार नाही. त्यांचे कोटे असतात. त्यांचा कोटा पुर्ण झाल्यानंतर बँक लोन देत नाही, तरी ते स्वतः लोन घेऊन काम करु शकतील. ही अडचण टेक्निकल अडचण आहे. काही ठिकाणी बँक लोन देत नाही.

**केशव घरत :-**

स्वतःने जर व्यवसाय सुरु केला, स्वतःच्या पैशाने आणि त्याला मागणी व बाजारभावात माल खपला नाही तर त्यांचे पैसे फुकट नाही जातील का?

**प्रेमनाथ पाटील :-**

नगरपालिकेने तो सामान घ्यायला पाहिजे. जे काही खडू, झाडू वगैरे.

**केशव घरत :-**

नगरपालिकेने घ्यायला पाहिजे.

**कैलासबेन जानी :-**

बँकेच्या मॅनेजरची सभा घ्यायला पाहिजे की, आपल्या माणसाने जर लोनकरिता अर्ज केला तर लोन किती रक्कमेपर्यंत देतील?

**मिलन पाटील :-**

श्री. संख्येजी आपण जे शिफारस पत्र देतो, कर्ज देण्याकरिता बँकेला शिफारस करतो. आपल्याकडे त्याचा काही रेकॉर्ड आहे का? त्या व्यक्तीने त्या बँकेला परतफेड केलेली नाही, अशी जवळ जवळ ९५ टक्के लोक आहे. तुम्ही त्याबाबत काही दखल घेतलेली आहे का? म्हणून तुम्हांला बँक लोन देत नाही. पण ज्यांची तुम्ही शिफारस करता, त्या माणसाकडे परत जाऊन बघता की, ज्या माणसाने आपल्याकडून हे कर्ज घेतलेले आहे, कोणत्याही वस्तुकरिता, ते कर्ज घेतांना बँकेकडून पैसे आल्यानंतर ती वस्तु तिथे नसते.

**प्रेमनाथ पाटील / केशव घरत :-**

कर्ज मिळाले का, ते पहिल्यांदा बघायला पाहिजे. त्याच्यानंतर ते हप्ते भरतात की, नाही ते बघायला पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

त्यांची जर ऐपत नसेल बँकेमध्ये कर्ज न भरण्याची तर त्यांना बँक कसे कर्ज देईल?

**मिलन पाटील :-**

पण जे कर्ज दिलेले आहे, त्याची परतफेड केलेली नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य ४२ लोकांना कर्ज देण्याचे उद्दीष्ट असते. वर्षाला एवढ्या उमेदवारांना कर्ज द्यायचे असे असते आणि ते त्यांचे काम बरोबर करुन घेतात आणि त्याच्यावरची जी उद्दीष्ट असतात पुर्ती करण्याची त्यांना प्रॉब्लेम येतो. त्याकरिता बँकेचे जे मॅनेजर आहेत, त्यांची सभा आपण आता लावून घ्या आणि त्यांना असे प्रस्ताव मांडा, स्थायी समितीचे दोन-चार सदस्य घेऊ, अधिकारी घेऊन चर्चा करुन घेऊ.

(सन्मा. सदस्या श्रीम. अनिता पाटील ह्यांनी प्रकरण क्र. ५७ चा ठराव सभागृहामध्ये मांडला.)

**रिटा शाह :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ५७ :-**

महानगरपालिका क्षेत्रातील आर्थिकदृष्टया मागासलेल्या गरजु मुला-मुलींसाठी महिला व बालकल्याण समितीच्या निधीतून विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याबाबत. (मा. महिला व बालकल्याण समितीने शिफारस केलेले प्रकरण) (मा. स्थायी समिती सभा दि. १३/०६/२००५ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ३०)

**ठराव क्र. ६२ :-**

महानगरपालिका क्षेत्रातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या गरजु मुला मुलींनसाठी महिला व बालकल्याण समितीच्या निधीमधुन लघुउद्योग (अगरबत्ती, मेणबत्ती, खडू, साबण बनविणे, फॅन्सी ज्वेलरी मेकिंग, कापडी बॅग, पेपर बॅग, लेदर बॅग्स, ब्युटिशियन, संगणक, शिलाई मशीन, वाहनचालक, इलेक्ट्रीशियन आणि प्लबिंग व इतर सर्व प्रकारचे प्रशिक्षण द्यावयाचे आहे. सदर प्रशिक्षणासाठी नगरसेवक, नगरसेविकांचे शिफारस पत्र येतात.

सदर प्रशिक्षणासाठी एका कार्यक्रमावर शासनाच्या आदेशाप्रमाणे रु. २००० एवढा खर्च अपेक्षित आहे. महिला व बालकल्याण समिती सन २००५-०६ वर्षासाठी ५५ लाख तरतुद आहे. तरी सन २००५-०६ या वर्षीत प्रशिक्षण देण्यासाठी येणा-या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- सौ. अनिता पाटील.** **अनुमोदन :- सौ. रिटा शहा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५८ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

वृक्ष प्राधिकरण व स्थायी समितीचा मागचा जो ठराव पारित केलेला होता त्यामध्ये वृक्ष प्राधिकरण समितीकडे बजेट कमी आहे. झाडे जगवा, झाडे लावा असे उद्दीष्ट सगळ्यांचे आहे. त्याकरिता जो खर्च झाला व झाडांचे उद्दीष्ट कमी होतील, त्या दृष्टीकोनातून जनरल फंडातून घेण्याच्या दृष्टीकोनातून आपण हा विषय पुन्हा येथे आणलेला. एकत्र दोघांचा अभ्यास दौरा झाला पाहिजे. म्हणून आपण हा विषय पुन्हा घेतलेला आहे. त्याकरिता कोणती वेळ असावी? तो दौरा कोणत्या पद्धतीने करावा? कसे जावे? काय करावे? ह्याकरिता आपण येथे चर्चा करावी.

**केशव घरत :-**

साहेब दौरा आयोजित करतांना दोन दिवस एक्स्ट्रा ठेवावे.

**सुर्यकांत भोईर :-**

वृक्ष प्राधिकरणाचे सदस्य रिटायर होणार होते, ते रिटायर झाले का?

**मा. सभापती :-**

३१ जुलै रोजी रिटायर होतील.

**सुर्यकांत भोईर :-**

सचिव साहेब बोलत होते की, ३० जुनला रिटायर होणार होते ना!

**मा. सभापती :-**

वृक्ष प्राधिकरण समितीची मंजुरी झालेली आहे. स्थायी समितीच्या समोर विषय आणलेला आहे, आपल्याला त्यांच्याबरोबर आणायचे आहे. त्यांचा विषय मंजुर झालेला आहे, त्यामुळे त्यांचा विषय मंजुर झालेला आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

ते आज रिटायर झालेले आहेत, मग त्यांना आपण कसे सामावून घेणार?

**मा. सभापती :-**

पुढील मंजुरी होईल तेव्हा ना? त्यांचे पुढील सदस्य येईपर्यंत ते सदस्य आहेत. ही समिती गठित असतांना मागच्या वेळेला ठराव झालेला होता. ते त्या पदावर होते. ते पदावर असतांना त्यांना घेऊन जायला हरकत नाही. ते पदावर आहेत. त्यांचा ठराव जर ते सदस्य पदावर नसतांना झाला असता तर गोष्ट वेगळी होती. म्हणून जर त्यांना समाविष्ट करुन घेतले तर बरे होईल. मा. महासभा लावण्याबद्दल जर निर्देश असतील तर सर्व स्थायी समिती सदस्यांना मा. महापौरांना आता भेटून घ्या.

**प्रकरण क्र. ५८ :-**

मा. वृक्ष प्राधिकरण समिती सदस्यांसोबत मा. स्थायी समिती सदस्यांचा अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत.

**ठराव क्र. ६३ :-**

बेंगलोर हे उद्यानाचे शहर म्हणून जगप्रसिद्ध असून ते पर्यावरणाचे दृष्टीने अतिशय चांगले शहर आहे. तसेच तेथे भारतीय उद्यान विद्या संशोधन केंद्र असून उद्यानांचा विकास कशा प्रकारे करावा याबाबत चांगली माहिती तेथे मिळू शकते. त्यामुळे बेंगलोर येथील अभ्यास दौऱ्याचा मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यांनाचा विकास करण्यामध्ये चांगली मदत होईल.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समिती सदस्य, स्थायी समिती सदस्य, पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांचा बेंगलोर व म्हैसूर येथे अभ्यास दौरा आयोजित करुन वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य यांचा खर्च वृक्षप्राधिकरण फंडामधून व स्थायी समिती सदस्य, पदाधिकारी, अधिकरी व कर्मचारी यांचा खर्च नगरसेवक प्रशिक्षण फंडामधून करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. केशव घरत.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५१ चे वाचन केले.)

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती महोदय, राई व्यायाम शाळेचा जो वीज बिलाचा जो विषय आलेला आहे. नक्की वीज कशामुळे कापली गेली आहे?

**सुर्यकांत भोईर :-**

महापालिका ते बिल का भरु शकत नाही.

**मिलन पाटील :-**

आमदार फंडातून व्यायाम शाळा बांधली होती ना?

**हॅरल बोर्जीस :-**

जे वीज बिल आले असेल ते वीज बिल भरण्याची कोणाची तरी जबाबदारी असेल. जर त्या संस्थेबरोबर करार झालेला असेल तर त्या संस्थेची जबाबदारी असेल. अन्यथा महापालिकेने ते वीज बिल भरले पाहिजे. वीज बिल कापण्याचे कारण काय?

**अनंत पाटील :-**

वीज बिला संदर्भामध्ये जवळ-जवळ ग्रामपंचायतीपासून नगरपालिका आल्यानंतर ते पहिले समाजमंदिर बनविण्यांत आले. त्या समाजमंदिरापासून आजतागायत तिथे सामाजिक क्रिडा होता होत्या. परंतु, तिथे

मीटर नसल्या कारणाने सरासरी बिल नगरपालिकेतर्फे देण्यांत येत होते. त्याच्यानंतर बिल भरले गेले नाही म्हणून ते केबल संपुर्ण कापले गेले आहे. आम्ही वेळोवेळी महानगरपालिकेबरोबर संपर्क साधला होता की, जे बिल आहे ते बिल भरा. नविन मीटर टाकत आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

साहेब, जर ह्यांच्याबरोबर व्यायामशाळेचा करारनामा झालेला असेल तर महानगरपालिकेने ते बिल भरायला पाहिजे होते.

**अनंत पाटील :-**

नगरपालिका मी असतांना बांधकाम झाले होते. त्याच्यानंतर मी नसतांना व्यायामशाळेला लावले आणि बांधकाम झाले व ती व्यायामशाळा बांधली गेली. त्यावेळी वेळोवेळी मा. महासभेत व स्थायी समितीमध्ये विषय काढला होता. परंतु, ते चालवणारा कोण आहे? महानगरपालिकेकडे चालवायला दिलेले आहे का? त्याचा खुलासा आजपर्यंत झालेला नाही. व्यायामशाळेच्या व्यतिरिक्त हे समाजमंदिर आहे आणि व्यायामशाळा वेगळी. त्या दोघांना तिथे मीटर बॉक्सची आवश्यकता आहे. त्यामुळे अंधारात त्यांना सामाजिक कार्यक्रम घ्यावे लागते. खाजगी माणासाकडून ते घ्यावे लागते.

**हॅरल बोर्जीस :-**

सद्य स्थितीमध्ये अशी परिस्थिती दिसते की, सदर व्यायामशाळेची जबाबदारी वस्तुतः क्लिअर होत नाही की, ह्या संस्थेची जबाबदारी आहे. वीज बिलाची जर काही अडचण येत असेल तर ह्याच व्यायामशाळेच्या बाजुला समाजमंदिर आहे. तुर्त त्याला समाजमंदिराकडून ज्यावेळेकरिता त्यांना जी आवश्यकता आहे. तर तेथून लाईट घेऊन वापरायला सांगा आणि हा विषय व्यवस्थितरित्या विषयपटलावर घ्या.

**रिटा शाह :-**

बांधकाम विभागाचे अधिकारी येथे उपस्थित आहेत. त्यांनी क्लेरिफिकेशन द्यावे की, ते कोणाच्या ताब्यात आहे?

**दिपक खांबित :-**

आमच्याकडे कुठल्याही संस्थेचा तसा पत्रव्यवहार नाही.

**मा. सभापती :-**

पत्रव्यवहार नाही तर तिथे वीज कोण वापरतो असे होईल.

**अनंत पाटील :-**

व्यायामशाळेचा जर पत्रव्यवहार नसेल तर समाजमंदिराचे असेल ना? आणि समाजमंदिर हे आपल्याकडून दिलेले आहे.

**मा. सभापती :-**

ती व्यायामशाळा कोणाची आहे? त्या संस्थेचे नांव आदर्श असे आहे ना?

**हॅरल बोर्जीस :-**

आदर्श सेवा मंडळ असे आहे.

**रिटा शाह :-**

त्यांनी करायला पाहिजे. त्यांनी वीज भरायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

आदर्श सेवा मंडळाचे अध्यक्ष कोण आहेत?

**अनंत पाटील :-**

त्याचा अद्याप कोणीही खुलासा केलेला नाही. मीदेखील तेच म्हणतो, ती संस्था कोणाची आहे?

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मग लाईट ठेवा.

**रिटा शाह :-**

कोणाला? कशाला आपण लाईट द्यायची?

**अनंत पाटील :-**

समाजमंदिरला द्या. व्यायामशाळेला लाईट देऊ नका.

**मा. सभापती :-**

विषय तो नाही. मुळात विषय येथून सुरु होतो. पर्यायी वीजेची व्यवस्था करु या, हा विषय वेगळा. परंतु, मिरा भाईंदर महानगरपालिका झाली, नगरपालिका झाल्यानंतर, अधिका-यांना भत्ते मिळाले, गाड्या मिळाल्या व त्या अधिका-यांना हे माहिती नाही, ती व्यायामशाळा कोणाला दिलेली आहे? भाड्याने दिलेली आहे की, नाही दिली? आदर्श सेवा मंडळ वापरते, कुठले आणखीन मंडळ आहे, तो वापरतोय त्याची कल्पनाच नाही.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

हा विषय विषयपटलावर आला कसा?

**मा. सभापती :-**

या विषयाची मागणी होती. सन्मा. सदस्य अनंत पाटील ह्यांची मागणी होती की, ह्या ठिकाणी वीज भरले नाही ते भरायला पाहिजे म्हणून त्यांनी आपल्याकडे अर्ज केलेला आहे. म्हणून तो विषय आपण या ठिकाणी आणला.

**मिलन पाटील :-**

बिल किती बाकी आहे?

**रिटा शाह :-**

दोन लाख रुपये.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

मी सन्मा. सदस्यांना सांगतो की, आपण त्या विभागाचे नगरसेवक आहात. वीज बिलाचे काम त्यांनी पहावे व ती व्यायामशाळा त्यांनी चालवायला घ्यावी.

**अनंत पाटील :-**

ती व्यायामशाळा एका संस्थेला चालवायला दिली आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

संस्थेला दिलेले असेल तर ती संस्था बघेल.

**सुर्यकांत भोईर :-**

संस्थेला दिलेले आहे तर दोन लाख रुपये महापालिका का भरेल?

**केशव घरत :-**

ते वीजेचे बिल संस्थेने भरायला पाहिजे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सन्मा. सदस्य अनंत पाटील साहेब बोलतात की, संस्था आहे आणि श्री. खांबितजी बोलतात की, संस्था नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य अनंत पाटील साहेब, आपला जो विषय आहे, आम्ही भावनेपोटी विषय आपल्यासमोर आणला की, कुठेतरी त्याचा सदुपयोग झाला पाहिजे. परंतु, मिरा भाईंदर महानगरपालिकेची ही वास्तु आहे. आमदार फंडातून आले की, खासदार फंडातून आले किंवा अन्य कोणाच्या फंडातून आल्यानंतर त्याचा संपुर्ण अधिकार हा मिरा भाईंदर महानगरपालिकेचा आहे. ती मिरा भाईंदर महानगरपालिका अस्तित्वात असतांना, ज्यांनी नगरपालिका ते मिरा भाईंदर महानगरपालिका होईपर्यंत व्यायामशाळा वापरलेली आहे व त्यांनी सामान आणलेले आहे, त्यांना कोणत्या कराराने दिलेले आहे? कोणत्या ठरावाने दिलेले आहे आणि कोणी वापरलेले आहे? किती बिल आहे? ह्याची संपूर्ण माहिती न मिळाल्याशिवाय जर ह्याला मंजुरी दिली तर उद्या आर्थिक बोजाला हे सर्व सदस्य जबाबदार राहतील.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्याची माहिती ह्यांना कधी मिळेल?

**अनंत पाटील :-**

आपण हा जो नगरपालिकेने ठराव केलेला आहे या ठरावामध्ये जवळ जवळ घोडदेव येथील मार्केट, विठ्ठल मंदिर, मोर्वा येथील क्रिडांगण आणि राई येथील व्यायामशाळा हा एकत्रित ठराव तुमच्याजवळ आहे. नगरपालिकेमध्ये वाचला गेला होता. त्यांची आपण चौकशी करत नाही आणि त्याला जी आवश्यक एलिजीबिलीटी आवश्यक आहे, सामाजिक कामामध्ये उपयोग आहे, तिथे तुम्ही बिल भरा आणि बॉक्स लावायला घ्या.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य अनंत पाटील ह्यांनी जी माहिती दिली की, क्रिडांगण, विठ्ठल मंदिर त्या ठरावामध्ये हे समाविष्ट केलेले आहे का, ते बघा आणि त्यांच्याकडून वसुली करुन घ्या.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

ते कोणत्या संस्थेला दिलेले आहे, त्यांच्याकडून वसुल करुन घ्या.

**मा. सभापती :-**

पुढच्या सभेला आपण ह्याची सविस्तर माहिती आणा.

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्स साहेबांनी जो सुझाव दिलेला आहे तो योग्य आहे. आता कोणाला नविन संस्थेला द्यायचे असेल तर द्या. जर तुमच्याकडे रेकॉर्डमध्ये नाही, त्यामध्ये ते बिल भरुन घेणार.

**हॅरल बोर्जीस :-**

जुने बिल कोण भरणार?

**मा. सभापती :-**

समाजमंदिर आणखीन कुठे आहे का?

**अनंत पाटील :-**

समाजमंदिर आहे, पण ते जुनं आहे.

**मा. सभापती :-**

आपल्याला जी वीज समाजमंदिराला हवी आहे, ती वीज कशाला हवी आहे?

**अनंत पाटील :-**

समाजमंदिराला वीज पाहिजे.

**मा. सभापती :-**

कुठली संस्था तिथे पुन्हा काम करणार आहे?

**अनंत पाटील :-**

सार्वजनिक आहे, त्याच्यामध्ये संस्था कोणी नाही.

**मा. सभापती :-**

आपण अशी एक संस्था आणा. त्या संस्थेला आपण ते सार्वजनिक मंदिर देऊ. सार्वजनिक वापराकरिता बोलत आहे. ते जर मेन्टेनन्स वगैरे करीत असतील, मी मागच्या वेळी हा विषय मांडला होता. जेवढी समाजमंदिर मिरा भाईंदरमध्ये आहे, त्या समाजमंदिराबाबत आपण विषय घेऊन या. कोणाला समाजमंदिर दिलेले आहे आणि कोणाला समाजमंदिर पाहिजे, तो विषय आणा. सन्मा. कार्यकर्ते श्री. पालांडे ह्यांनी मागणी केलेली आहे, अशी आपण मागणी करा आणि ते समाजमंदिर वापरा.

**अनंत पाटील :-**

समाजमंदिर आहे, तिथे मंच केलेले आहे आणि सार्वजनिक कार्यक्रम होतात, क्रिकेट वगैरे, ते आपन आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य त्याकरिता आपण मागणी करा. आपण त्यांना देऊ.

**अनंत पाटील :-**

क्रिकेट क्लब आहे.

**मा. सभापती :-**

सदरचा विषय पुढच्या सभेत घेण्यांत येत आहे. आपण मागणी करा आणि मा. उपायुक्त साहेब, कोणाच्या ताब्यात समाजमंदिर दिलेले त्याची सविस्तर माहिती आणा आणि जसे सन्मा. सदस्य अनंत पाटील साहेबांनी सांगितले की, ह्या ठरावाद्वारे जी समाजमंदिर दिलेली आहेत, क्रिडांगण दिलेले आहे, देवालय ट्रस्टचे जे दिले आहे, त्या ठरावाची संपुर्ण माहिती ह्या सभेसमोर घेऊन या.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती महोदय, आपल्या कार्यकाळामध्ये माझ्या येथे एक व्यायामशाळा बांधली गेली. सद्य स्थितीमध्ये डोंगरीच्या व्यायामशाळेमध्ये अशी परिस्थिती आहे की, जिथे गरजू गरजवंताची मुले त्या व्यायामशाळेचा उपयोग करुन घेतात आणि बऱ्याचशा मुलांची आर्थिक परिस्थिती नसतानासुद्धा तिथे इन्स्ट्रक्टर देऊन ते काम चाललेले आहे. परंतु, परिस्थिती अशी आहे की, दोन वर्षापासून लाईट बिल आम्हीच भरतोय. कारण अधिकृतरित्या आम्हांला ते अजुन दिलेले नाही आणि ह्याविषयी मी तुम्हांला पत्रही दिलेले आहे की, हा विषय विषयपटलावर द्या. मी एवढ्यासाठीच तुम्हांला सांगतो की, महापालिका ती व्यायामशाळा स्वतः बघू शकत नाही म्हणून आमच्या संस्थेने त्या व्यायामशाळेची देखभाल दुरुस्ती चालू केलेली आहे आणि लाईट बिलसुद्धा आमच्याच माथी पडत आहे. तेथून इंन्कम सोर्स तर काहीच नाही. आमच्याच खिशातून पैसे टाकावे लागत आहे. हा विषय कृपया आगामी सभेसमोर घेऊन अधिकृतरित्या जर डोंगरीची व्यायामशाळा चालवायला दिली तमर मला वाटते की, ते चांगले होईल. याबाबत मी आपल्याला तसे लेखी पत्र देतो. त्या अनुषंगाने आपण हा विषय पुढच्या सभेत घ्यावा.

**प्रकरण क्र. ५१ :-**

राई येथील व्यायामशाळा विजबिलाबाबत.

**ठराव क्र. ५६ :-**

मा. सभापती सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५२ चे वाचन केले.)

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती महोदय, अधिकारी, कर्मचारी, कर निरिक्षक सर्व्हेअर ह्यांचा रितसर सविस्तर प्रस्ताव स्थायी समितीसमोर आणावा. कारण ह्या अर्थसंकल्पामध्ये पुरेशी तरतुद आहे की नाही त्याचासुद्धा आपल्याला विचार करावा लागेल. ह्याचा सविस्तर प्रस्ताव आस्थापना विभागाकडून आपण मागवून घ्या.

**गजानन भोईर :-**

याबाबत पुढच्या सभेला सविस्तर माहिती आणा. काही असे अधिकारी आहेत की, त्यांना कळत नाही, ते बसलेले असतात. त्यांना असे दिलेले आहे. ज्यांना गरज आहे त्यांना द्या. आता सर्व्हेअर, टॅक्सवाले फिरतात.

**सुर्यकांत भोईर :-**

फक्त खुर्च्या गरम करतात असे अधिकारी किती आहेत, ते आपण सांगा.

**गजानन भोईर :-**

आहेत, आपल्याला असे किती पाहिजे? एक अंकी संख्या सांगू की, दोन आकडी संख्या सांगू?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर, सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईरजी व सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीसजी ह्यांनी ह्या प्रस्तावाबद्दल या ठिकाणी ज्या विषयावर चर्चा केली ह्याकरिता किती बजेट आहे ते पडताळून पाहू आणि आस्थापना विभागाने पुर्णपणे या सर्व अधिका-यांची माहिती आणावी आणि पुढच्या वेळेला विषय घेऊन अग्रक्रमाने ह्या विषयाला मंजुरी देऊ.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, असेही ह्यामध्ये नमुद करा की, अधिकारी ह्यांची व्याख्या काय? कारण एक अधिकारी मला बोलता होता की, तो अधिकारी नाही, कर्मचारी आहे. म्हणून अधिकारी ह्यांची व्याख्या काय तेदेखील आपण ठरावामध्ये आणा.

**मा. सभापती :-**

ठिक आहे, पुढच्या वेळेला पदाधिका-यांचे एकत्र आणणार आहोत.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, आपले जे अधिकारी आहेत त्यांना प्रायव्हेट गाड्या देतो. स्वतःच्या गाड्या देतो की, काय आहे? त्याच्यावर काय खर्च झाला हेही आपण त्याच्यामध्ये घ्या. प्रत्येक गाडी नंबर घेऊन खर्चाचे घ्या. माहिती तर होईल की, महानगरपालिकेचे इंधन कुठे जळते? इंधनाची नुसती गळती लागलेली आहे.

**प्रकरण क्र. ५२ :-**

अधिकारी / कर्मचारी (करनिरिक्षक अधिक्षक, सर्व्हेअर व लिपीक) आदी अधिकारी वर्गास इंधन भत्ता अदा करणेबाबत.

**ठराव क्र. ५७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर निरिक्षक, सर्व्हेअर, स्वच्छता निरिक्षक यांना दैनंदिन कार्यालयीन कामाकरिता महापालिकेच्या विविध प्रभागामध्ये स्वखर्चाने फिरावे लागते. तसेच त्यांना सदर कामासाठी प्रवास / दैनिक भत्ता महानगरपालिका देत नाही. तरी वरील नमूद पदावरील कर्मचा-यांना रु. १०००/- वाहन भत्ता प्रति महिना प्रदान करण्यास ही स्थायी समिती मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. गजानन भोईर.** **अनुमोदन :- सौ. कैलासबेन जानी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १२.५० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका